# प्रकरण नववे

## समर्थांच्या प्रपंच विज्ञानाचे मूळ अधिष्ठान - 'अध्यात्म'

|| मुख्य ते हरिकथा निरुपण ||

| देव मस्तकी धरावा | अवघा हलकल्लोळ करावा ||

या दृष्टीने समर्थांच्या भक्ती आणि अध्यात्म विचारांचा मागोवा

प्रकरण नववे

## समर्थांच्या प्रपंच विज्ञानाचे मूळ अधिष्ठान - ' अध्यात्म '

" मुख्य ते हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे तें सावधपण । सर्वविषयी ।।" दास.।।-5-4

" अध्यात्म " हे समर्थांच्या प्रपंच विज्ञानाचे मूळ अधिष्ठान आहे. तसेच भारतीयांचा धर्म विचार हा अध्यात्मावर आधारलेला आहे. "[1] परमेश्वराच्या स्वरूपात धर्माची उत्पत्ती, धारणा व परिपूर्ती आहे अशी त्यांची भावना होती. धर्मानुष्ठानाला अध्यात्मदृष्टीची जोड हवी, ती नसेल तर केवळ बाह्यकर्म म्हणजे धर्मभावनेची विटंबनाच होय. बुध्दी शुध्द व स्थिर राहिली तर आत्मसिध्दीचा मार्ग निर्वेधपणे अनुसरता येतो. सद्‌गुरु , सच्छिष्य , बध्द , मुमुक्षू , साधक , सिध्द , नवविधा भक्ती , चार मुक्ती , साधकावस्था , आत्मसाक्षात्कार यांच्या विवेचनातून व वर्णनांतून समर्थ वाङमयातील अध्यात्माचे स्वरूप अुघड करुन दाखविलेले आहे. अध्यात्माच्या भवती प्रपंच नि:सत्व बनतो हा विचार त्यांनी प्रथापित केला. परमार्थाचा अनादर करुन संकुचित , स्वार्थी प्रपंचात गढणा-यांना त्यांनी पढतमूर्ख म्हटले आहे. प्रपंचातील आघात धैर्याने सहन करण्याची शक्ती अध्यात्मिक वृत्तीमध्येच असू शकते याची त्यांना जाणीव आहे

समर्थाचे अकरावे ओवीशतक त्यांचा प्रपंच परमार्थ विवेक स्पष्ट करणारे आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोहोंमधील सामर्थ्यासाठी जाणतेपणाची आवश्यकता आहे असे ते म्हणतात. प्रपंच आणि परमार्थ या दोहोंना समाविष्ट करणारा विवेक म्हणजेच अध्यात्मविद्या होय. विष्य सुखाचा संपूर्ण त्याग केल्याशिवाय परमार्थ साधत नाही. प्रपंचात जर संपूर्णपणे यशस्वी व्हायचे असेल तर प्रथम परमार्थाकडे वळून प्रपंच - परमार्थ यांची व्यवस्थित सांगड घालता आली पाहिजे. " " मी " पणाने वागल्यास प्रपंच व परमार्थ दोन्हीही बुडतात.

" ईश्वरी प्रेमा अधिक । प्रपंच संपादणे लौकिक ।
सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ।। " 2

इतर सर्वांपेक्षा ईश्वरावर अधिक प्रेम असणे, चार लोकांप्रमाणे प्रपंच सांभाळणे, आणि हृदयात सदैव विवेक जागा ठेवणें म्हणजे सत्वगुण होय. जो संसारातील दुःखाचा विसर पाडतो, भक्तीमार्ग स्पष्टपणें दाखवितो, आणि प्रत्यक्ष भजन करायला लावतो तो सत्वगुण होय. एकदम प्रपंचत्याग करण्याएवढे दृढ वैराग्य कुणाच्याच ठिकाणी नसते. प्रपंचाची जर वासना उत्पन्न होत असेल तर परमार्थाकडे वळावे असे ते म्हणतात.

" देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।

दास. 2-7-9

समर्थांनी प्रपंच सोंडून इतर विषयांचा अभ्यास करतानाही भगवत्भक्तीला महत्वाचे स्थान दिले आहे. प्रपंच अशाश्वत म्हणून तो हातचा गेला आणि परमार्थ खोटा मानला म्हणून तो केला नाही अशी अवस्था असूनही जो देवाचा द्वेष करतो त्याला समर्थांनी मूर्ख म्हटलेले आहे. प्रपंच ईश्वरार्पण बुध्दीने कसा करावा याचा त्यांनी साकल्याने विचार केलेला आहे.

मुख्य ते हरिकथा निरुपण आणि दुसरे ते राजकारण, तिसरे सावधपण अ समर्थ जेंव्हा म्हणतात तेंव्हा ते अध्यात्माची भूमिका अथवा पार्श्वभूमी हे पहिले लक्षण होय असे त्यांनी स्पष्ट केलेले आहे. भगवंताचा विसर कधी पडूं देता कामा नये. राजकारण म्हणजे नुसतेच राजकारण नसून समर्थांना तेथे व्यवहार अपेक्षित आहे. व्यवहारानें वागणे हे दुसरे लक्षण होय. व्यवहार चांगल्या रितीने पार पाडावयाचा असेल तर त्यासाठी मनुष्याजवळ व्यवहारचातुर्य असावे लागते. व्यवहार चातुर्यासाठी सावधपणा आवश्यक आहे. सर्व बाबतीत सावध असणे हे तिसरे लक्षण होय. राजकारणाच्या बाबतीत जरी विचार केला तरी राजा व प्रजेच्या संदर्भात बोलताना राजा किंवा एखाद्या जनसमुदायाचा पुढारी यांचे लक्ष चौफेर असले पाहिजे. तसेच राजकारण हा शब्द समर्थ कोणत्या अर्थाने वापरतात हे सांगणे आवश्यक आहे.

12719
A

कोणत्याही पुढा-याचा साधुसंत, धर्मसंस्था, राज्यसंस्था आणि अर्थसंस्था याच्याशी अगदी निकटचा संबंध योते. कोणत्याही राजकीय पुढा-याला साधुसंतांच्या आशिर्वाद आणि पाठिंब्याची गरज असते. लोक समुदायाला चांगल्या रितीने वश करायचे असेल तर त्याच्याकडे व्यवहार चातुर्य असावे लागते. आणि हे व्यवहार चातुर्य म्हणजेच राजकारण होय जे लोक राजकारणी आहेत. त्यांच्यासाठी राजनीतीचा उपदेश करण्यासाठी समर्थांनी वरील ओवी सांगितलेली आहे.

...000...

प्रकरण नववे

## संदर्भ


1 " संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती " - ले. गं. बा. सरदार

2 " दासबोध " - 2:7:9